Vol 7 Issue 3 Dec 2017

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER - 2017

# "किशोरावस्थेतील मुलामुलींच्या सामाजिक समस्ये संदर्भात एक अध्ययन"

कु. ज्योत्स्ना ला. गजभिये

सारांशः—

मानव सामाजिक प्राणी आहे. मुल ज्या समाजामध्ये लहानाचे मोठे होते त्या समाजाची मूल्य, नियम, रीतीरिवाज या सर्व घटकाचे त्यांच्या सामाजिक विकासावर कळत न कळत परिणाम होत असतो म्हणून मुलांच्या विकासात सामाजिक विकासाला महत्व आहे.

किशोरावस्थेचे वय हे मुलामुलींच्या जीवनात महत्वाचे वय असते. याच काळात आपण चांगले दिसावे असे त्यांना वाटत असते. तसेच भिन्न लैगिंक आकर्षण सुध्दा त्यांना वाटू लागते स्वतःचे मित्र मैत्रिण स्वतःच निवडले जातात म्हणजेच एकप्रकारे समवयस्क मित्रमंडळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या अवस्थेतील मुलामुलींना स्वतंत्रपणे वागणे पसंत असते मोठया व्यक्तींनी त्यांच्या कोणत्याही बाबतीत दखल घेतलेली त्यांना आवडत नाही या अवस्थेतच मुलामुलींना सामाजिक विकासाचे ठराविक प्रश्न भेडसावित असतात म्हणून किशोरावस्थेतील मुलामुलींची सामाजिक समस्या जाणून घेण्यासाठी या समस्येची निवड करण्यात आली आहे.

Key words:- किशोरावस्थेची व्याख्या, सामाजिक विकाससंबंधी व्याख्या

## प्रस्तावनाः

सामाजिक समस्येचा अभ्यास करण्यापूर्वी सामाजिक विकास म्हणजे काय हे जाणून घेणे महत्वाचे आहे. "सामाजिक संबंधामध्ये परिपक्वता येणे म्हणजे सामाजिक विकास होय."

किशोरावस्थेतील मुलामुलींचा सुरवातीचा काळ सामाजिक वाढीच्या दृष्टीने अधोगतीचा व अनिश्चिततेचा वाटतो. याच काळात सामाजिक संबंध कौटुंबिक संबंधाना पुरक असे असतात या अवस्थेतील मुलांना घराची इतकी ओढ राहात नाही घर आणि शाळा यापेक्षाही अधिक जिव्हाळा त्यांना मित्र मैत्रिणीच्या गटाबद्दल वाटू लागतो. मुलेमुली टोळया म्हणजे गट करुन राहातात. म्हणून या वयाला 'टोळीचे वय' असे म्हणतात. सामाजिक संबंधातून त्यांच्या प्रोढ व्यक्तिमत्वाची रुपरेषा तयार होऊ लागते.



या अवस्थेत किशोरवर्ग स्वतःचे मित्र मैत्रिण स्वतःच निवडत असतात. त्यामुळे मित्र मैत्रिणीची निवड करण्यात चूक होण्याची शक्यता असते कारण चांगल्या वाईट सवयी लागण्याचा काळ पण हाच असतो. वाईट मित्रांच्या संगतीत मुलांना व्यसन लागण्याची शक्यता असते पण लहानपणी या उलट परिस्थिती असते. मित्रांची निवड साधारण आईवडील व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने होते म्हणून या वेळेस मुलामुलींना मोठयांनी योग्य मार्गदर्शन केले नाही तर भावी जीवनात वाईट परिणाम भोगावे लागतात.

या काळातील मैत्रि क्षणिक व भावनाशुन्य असत नाही मित्रांबद्दल मनापासून प्रेम वाटतो. मित्रांचे आदर्श त्यांचे आदर्श बनतात समूह ज्या प्रकारचा विचार करतो त्या प्रकारचाच विचार ते करतात. समूहात आपला स्वीकार व्हावा व आपले त्यात महत्वपूर्ण स्थान असावे अशी लालसा त्यांच्यात निर्माण होते. परंतु मित्रमंडळीकडून झालेली उपेक्षा, तिरस्कार असहनीय

झाल्यावर त्यांच्यामध्ये कुसमायोजनासंबंधी समस्या निर्माण होऊन त्यांच्या जीवनात मानसिक संघर्ष निर्माण होतो.

तसेच या अवस्थेतील मुलामुलींनमधील सामाजिक पैलुतील महत्वपूर्ण परिवर्तन हे आईवडील व इतर लोकांच्या संबंधातून दिसून येते. या वयातील मुलामुलींना स्वतंत्र वागणे पसंत असते कारण स्वातंत्र्य मिळविण्याची अभिलाषा त्यांना असते.त्यामुळे ते मोठयांची पर्वा करीत नाही.

आईवडीलांनी अधिक काळजी करणे त्यांना अपमानास्पद वाटते. आपले विचार आणि भावना यासाठी त्यांना पूर्णपणे स्वातंत्र हवे असते. मोठयांनी कोणत्याही बाबतीत दखल घेतलेली त्यांना आवडत नाही व विरोधही प्रगट केलेला खपत नाही म्हणून आईवडीलांनी सुचविलेल्या मार्गावर ते चालत नाही. समवयस्क मित्रमडंळीचा मार्ग, सल्ला अधिक प्रिय आणि हितकर वाटतो अशा अवस्थेत आईवडीलांचे अधिक बंधन घालणे धोकादायक ठरु शकते. परिणामतः किशोरावस्थेतील मुलेमुली विद्रोह करु शकतात.

मुख्यत्वेकरुन मित्र परिवाराची गरज ही सुरक्षिततेच्या भावनेने निर्माण होते. जी व्यक्ती किशोरांना सुरक्षिततेची जाणीव करुन देणारी व त्यांच्या अडचणी समजून घेणारी असते. तिच्याशी गाढ मैत्री होते. त्या व्यक्तीबद्दल आपुलकी निर्माण होते. याच सुमारास भिन्नलिंगी रुची वाढायला लागते. प्रेम, आकर्षण व वातावरण यावर मैत्री करणे अवलंबून असते.

किशोरावस्थेतील मुलामुलींनमध्ये सामाजिक विकास अधिक झाल्याने त्यांच्यात सामाजिक उत्तरदायित्वाची भावना येते. सामाजिक नियमानुसार ते वागण्याचा प्रयत्न करतात. या अवस्थेत मुलामुलीचे सामाजिक क्षेत्र हे विस्तृत झालेले असते त्याचा परिणाम त्यांच्या विकासावर झालेला आढळतो. बालवयातच सामाजिक विकास सुरु होतो पण त्याचा विशेष जोर या काळात दिसतो. व वाढत्या वयाबरोबर तो वाढत जातांना आढळतो.

म्हणून किशोरावस्थेतील मुलामुलींना पालक, शिक्षक व इतर वयस्क लोकांकडून योग्य वागणूक मिळाली व त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या गेल्यातर त्यांचा योग्य प्रकारे विकास होऊ शकतो. परंतु त्यांना अयोग्य वागणूक मिळाल्यास त्यांच्या स्वतःबद्दलच्या असलेल्या कल्पनांना धक्का पोहोचतो व आपण उपेक्षित आहोत ही भावना प्रबळ होऊ लागते. अशी मुले अंतर्मुख होतात जर ह्या उपेक्षित भावने बरोबरच मुलांमध्ये आक्रमक वृत्ती असेल तर मुले असामाजिक न होता समाजविरोधक होतात म्हणून किशोरावस्थेतील मुलामुलींच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना योग्य वागणूक देणे व मार्गदर्शन करणे हे मोठयांचे कर्तव्य आहे.

### उद्दिष्टये (Objective):–
१) किशोरावस्थेतील मुलामुलींच्या सामाजिक समस्येचा अभ्यास करणे.
२) किशोरावस्थेतील मुल व मुली स्वतःचे निर्णय स्वतः घेतात किंवा नाही याचा अभ्यास करणे.
३) किशोरावस्थेतील मुल व मुली पालकांनी घातलेल्या बंधनाचे पालन करतात किंवा नाही याचा अभ्यास करणे.
४) किशोरावस्थेतील मुलामुलींचे त्यांच्या पालकासोबत मतभेद होतात किंवा नाही याचा अभ्यास करणे.
५) किशोरावस्थेतील मुलामुलींचे त्यांच्या मित्राशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे.

### गृहीतकृत्ये (Hypothesis):–
१) किशोरावस्थेतील मुलामुलींच्या सामाजिक समस्या दिसून येतात.
२) किशोरावस्थेतील मुल व मुली स्वतःचे निर्णय स्वतः घेतात.
३) किशोरावस्थेतील मुल व मुली पालकांनी घातलेल्या बंधनाचे पालन करीत नाही.
४) किशोरावस्थेतील मुलामुलींचे त्यांच्या पालकासोबत मतभेद होतात.
५) किशोरावस्थेतील मुलामुलींचे त्यांच्या मित्राशी असलेले संबंध हे साधारण स्वरुपाचे असतात.

### संशोधन पध्दती (Research Method):–
### तथ्यांचा स्त्रोत (Sources of Data):–
संशोधनाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी किशोरावस्थेतील मुला मुलींच्या सामाजिक समस्या जाणून घेण्यासाठी एकूण १०० किशोरवयीन मुलामुलींची निवड करण्यात आली.

### शोधक्षेत्र (Study Setting):–
प्रस्तुत अध्ययनासाठी मोहाडी तालुक्यातील १०० किशोरवयीन मुलामुलींची निवड यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली.

### न्यादर्श नमुना निवड (Sample Size):–
अध्ययनासाठी एकूण १०० किशोरवयीन मुलामुलींची निवड करण्यात आली असून न्यायदर्शसाठी मोहाडी तालुक्यातील ५ विद्यालयाची निवड करण्यात आली. या शाळांची निवड सुध्दा यादृच्छिक पध्दतीने केल्या गेली. (मोहाडी, मोहगाव देवी, वरठी, करडी, पालोरा, ) प्रत्येकी एका विद्यालयातून २० मुला मुलींची निवड करण्यात आली आहे.

यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवडण्यात आलेल्या शाळा

| अ.क्र. | शाळेचे नांव | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद हायस्कूल मोहाडी | १० | १० | २० |
| २ | महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय मोहगाव देवी | १० | १० | २० |
| ३ | सनफ्लॅग स्कूल वरठी | १० | १० | २० |
| ४ | जिल्हा परिषद हायस्कूल करडी | १० | १० | २० |
| ५ | जिल्हा परिषद हायस्कुल पालोरा | १० | १० | २० |
| | एकूण | ५० | ५० | १०० |

तथ्यसंकलन :—

अध्ययनासाठी प्राथमिक स्त्रोत, दुय्यमस्त्रोत, प्रश्नावली अनुसूची मुलाखत, निरीक्षण याच्या आधारे माहिती संकलीत करण्यात आली आहे.

तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण व विवरण
(Statistical Interpretation of Data And Discussion)
सारणी

| अ.क्र. | विधान | होय | | शेकडा प्रमाण | नाही | | शेकडा प्रमाण | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | | मुले | मुली | | | |
| १ | तुम्ही तुमचे निर्णय स्वतः घेता का | ३५ | २८ | ६३ | १५ | २२ | ३७ | १०० | १०० |
| २ | तुम्ही पालकांनी घातलेल्या बंधनाचे पालन करता का | १७ | २३ | ४० | ३५ | २५ | ६० | १०० | १०० |
| ३ | तुमच्या मध्ये व पालका मध्ये मतभेद निर्माण होतात का | ३७ | २५ | ६२ | १२ | २६ | ३८ | १०० | १०० |

वरिल सारणीतील विधान क्र.1 वरून असे लक्षात येते की १०० % उत्तरदात्यापैकी ६३ % उत्तरदात्यांनी स्वतः निर्णय घेण्याविषयी होय म्हटले असून यामध्ये २८ % मुली व ३५ % मुलाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर ३७ % उत्तरदात्यांनी स्वतः निर्णय घेण्याविषयी नाही म्हटले आहे. यामध्ये २२ % मुली व १५ % मुलाचे प्रमाण आढळून आले आहे. म्हणून हे गृहितक स्पष्ट होते.

विधान क्र.2 वरून असे लक्षात येते की १०० % उत्तरदात्यापैकी ४० % उत्तरदात्यांनी पालकांनी घातलेल्या बंधनाचे पालन करण्याविषयी होय म्हटले असून यामध्ये २३ % मुली व १७ % मुलाचे प्रमाण आढळून आले आहे. तर ६० % उत्तरदात्यांनी पालकांनी घातलेल्या बंधनाचे पालन करण्याविषयी नाही म्हटले आहे. यामध्ये २५ % मुली व ३५ % मुलाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. म्हणून हे गृहितक स्पष्ट होते.

विधान क्र.3 वरून असे लक्षात येते की १०० % उत्तरदात्यापैकी ६२ % उत्तरदात्यांनी पालकासोबत मतभेद निर्माण होण्याविषयी होय म्हटले असून यामध्ये २५ % मुली व ३७ % मुलाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर ३८ % उत्तरदात्यांनी पालकासोबत मतभेद निर्माण होण्याविषयी नाही म्हटले आहे. यामध्ये २६ % मुली व १२ % मुलाचे प्रमाण दिसून आले आहे. म्हणून हे गृहितक सिध्द होते.

सारणी
मित्राशी संबंध दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विधान | मुले | मुली | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | साधारण | ३० | ३५ | ६५ |
| २ | चांगले | २२ | १३ | ३५ |
| ३ | वाईट | — | — | — |
| | एकूण | ५२ | ४८ | १०० |

वरिल सारणी वरून असे निदर्शनास येते की १०० % उत्तरदात्यांचे मित्राशी असलेले संबंध हे साधारण स्वरुपाचे आहेत यामध्ये ३० % मुले व ३५ % मुलीचे प्रमाण जास्त आहे. तसेच ३५ % उत्तरदात्यांचे मित्राशी असलेले संबंध हे चांगल्या स्वरुपाचे आहेत यामध्ये २२ % मुले व १३ % मुलीचे प्रमाण मुलीचे प्रमाण आढळून आले आहे. व वाईट संबंध असणा–या मध्ये एकही उत्तरदाते आढळले नाही म्हणून हे गृहितक सिध्द होते. एका उत्तरदात्याने सांगितले की आमचे संबंध चांगले असले तरी आमच्या मध्ये कधी कधी भांडणे होतात.

## निष्कर्षः–

१) ६३ % किशोरवयीन मुले व मुली स्वतःचे निर्णय स्वतः घेतात. यामध्ये स्वतःहून निर्णय घेण्याचे प्रमाण मुलानमध्ये सर्वात जास्त दिसून आले आहे.

२) ६० % किशोरवयीन मुले व मुली पालकांनी घातलेल्या बंधनाचे पालन करीत नाही. यामध्ये सर्वात जास्त प्रमाण मुलांचेच दिसून आलेले आहे.

३) ६२ % किशोरवयीन मुलामुलीचे पालकासोबत मतभेद निर्माण होत असतात. यामध्ये सुध्दा मुलांचेच प्रमाण सर्वात जास्त दिसून आले आहे.

४) ६५ % किशोरवयीन मुलामुलीचे मित्राशी असलेले संबंध हे साधारण स्वरुपाचे आहेत यामध्ये सर्वात जास्त प्रमाण मुलीचे दिसून आले आहेत.

## शिफारशीः–

१) पालकांनी व शिक्षकांनी किशोरवयीन मुलामुलींच्या समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य वागणूक देणे व मार्गदर्शन करणे.
२) पालकांनी किशोरवयीन मुलामुलींवर अधिक बंधंने घालु नयेत.
३) किशोरवयीन मुलामुलींचा सामाजिक विकास योग्य दिशेने होईल अशात–हेचे शाळेमध्ये सामाजिक वातावरण असावे.
४) किशोरावस्थेतील मुलामुलींनी मोठया व्यक्तीचा सल्ला घेऊन निर्णय घ्यावे.
५) पालकांनी किशोरवयीन मुलामुलींचे मित्र मैत्रिण कसे आहेत याकडे विशेष लक्ष दयावे.
६) पालकांनी मुलामुलींना आपले विचार व भावना व्यक्तकरण्यासाठी पूर्णपणे स्वातंत्र्य दयावे.

## संदर्भसूचीः–


१) बोधनकर, अलोणी आणि कुळकर्णी – सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, २०११ पृष्ठ. १०४
२) चंदवासकर नलिनी – किशोरावस्था, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, १९८२, पृष्ठ.५०,५४
३) गोगटे श्री.ब . – शिक्षणविषयक मानसशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर पूणे, ४११०३०, पृष्ठ.६७
४) कुलकर्णी के.वि. – शैक्षणिक मानसशास्त्र , श्री विद्याप्रकाशन पूणे, ४४१०३०, पृष्ठ. ६३
५) डॉ. पाटील वा.भा. – संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन्स नारायण पेठ पूणे, ४११०३०
६) डॉ.शेवतेकर शारदा, बडवे – विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र, प्रमोद मुंजे विद्याप्रकाशन नागपूर, ४४०००२ पृष्ठ. ६१




कु. ज्योत्स्ना ला. गजभिये

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com